| MHPU240004792025 | रामदास कोंडीबा वाळुंज व इतर<br>वि.<br>माणिक गणपत शिंदे व इतर |
|---|---|

## निशाणी क्र.३० वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने निशाणी क्र. ३४ कडे अर्जावर लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जातील नमुद कारण हे संयुक्तिक नाही. विलंबाबाबत कोणताही पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. त्यामुळे त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. उभय पक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. उभय पक्षकारातर्फे केलेल्या युक्तीवादाचा अभिलेखाशी विचार करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना समन्स लागून झाले. तेव्हा पासून ३० दिवसांचे आत त्याने कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, कैफियत देण्यासाठी त्याला संधी देवुनही त्याने कैफियत दाखल केलेली नव्हती. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ११/०६/२०२६ रोजी चार महिन्याच्या विलंबाने

दिलेला आहे. वादीतर्फे विधीज्ञांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे, अर्जात कोणतेही समाधानकारक कारण दिलेले नाही. कोणती कागदपत्रे मिळविण्यासाठी वेळ गेला ते नमूद केलेले नाही. परंतु, न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी त्याची कैफियत अभिलेखावर घेणे उचित होते. त्यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर रक्कम रु. ५००/– कॉस्ट बसवणे उचित होते.

**५.** या सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो –

अर्ज, रक्कम रुपये ५००/– कॉस्टस वादीला अदा करण्याच्या अटींवर मंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PATIL AVINASH MADHUKAR
Date: 2026.07.09 14:59:21 +0530

**[अविनाश म. पाटील]**

दिनांक : ०९/०७/२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

नि.दि.दावा क्र.६२/२०२५

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Pravin B. Jadhav. |
| Name of Court | : Shri. Avinash M. Patil.<br>Civil Judge Junior Division,<br>Ghodegaon. |
| Dictated and typed on | : 09/07/2026. |
| Corrected on | : 09/07/2026. |
| Signed on | : 09/07/2026. |